**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १३.०५.२०२६ बुधवार**

**नागपूर शहर पोलीस ठाणे अंतर्गत दाखल गुन्ह्यांपैकी १०६३ केसेसचा राष्ट्रीय लोक अदालत मध्ये निपटाराः—**

दिनांक ०९.०५.२०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालत मध्ये नागपूर शहर पोलीस ठाणे अंतर्गत कलम २२३, २८१, २८३, २८५ भा.न्या.सं. तसेच, महाराष्ट्र जुगार कायदा, महाराष्ट्र पोलीस कायदा, कोटपा व कलम २५८ सी.आर.पी.सी. अन्वये दाखल एकुण १११९ केसेसपैकी १०६३ केसेस निकाली काढण्यात आल्या. तसेच, कलम ३७८ भा.दं.वि. व कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये दाखल एकुण २६ केसेस मध्ये आपसी समझोता होवून केस निकाली काढण्यात आल्या. निकाली काढण्यात आलेल्या १०६३ केसेसमध्ये एकुण ३,२६,४००/—रू. चा दंड वसूल करण्यात आलेला आहे. जानेवारी ते एप्रिल २०२६ दरम्यान, महिला विषयक दाखल करण्यात आलेले एकुण ५२ गुन्हे निकाली काढण्यात आलेले असून, त्यामध्ये १४ गुन्ह्यांमध्ये दोषसिध्दी होवून, ईतर गुन्ह्यांमध्ये दोषमुक्त करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे, दिनांक १४.०३.२०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालत मध्ये नागपूर शहर पोलीस ठाणे अंतर्गत कलम २२३, २८१, २८३, २८५, भा.न्या.सं. तसेच, महाराष्ट्र जुगार कायदा, महाराष्ट्र पोलीस कायदा, कोटपा व कलम २५८ सी.आर.पी.सी. अन्वये दाखल एकुण १६२६ केसेसपैकी १५५१ केसेस निकाली काढण्यात आल्या. कलम ३७८ भा.दं.वि. व कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये दाखल एकुण ५८ केसेसमध्ये आपसी समझोता होवून केसेस निकाली काढण्यात आल्या. निकाली काढण्यात आलेल्या १५५१ केसेसमध्ये एकुण ४,९७,०००/—रू. चा दंड वसूल करण्यात आलेला होता.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाडी :— गंभीर अपघात करणारा आरोपी ताब्यात.**

दिनांक १३.०५.२०२६ चे ०१.१५ वा. ते ०१.३० वा. चे दरम्यान, वाहतुक शाखा एम.आय.डी.सी. विभाग येथील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे वाडी हद्दीत, नागपूर—अमरावती रोड हायवे—ग्लोरी चे विरूध्द बाजूस बॅरिकेट लावून वाहन तपासणी मोहिम राबवित असतांना, आयशर ट्रक क्र. एम.एच. ३२ ए.जे. ३०६० चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, बॅरीगेटला धडक मारून पळून गेला. धडकेत बॅरिकेट उडून पोअं. संतोष कांगुलवार यांचे अंगावर आदळल्याने त्यांचे हात—पाय व शरीराला गंभीर दुखापत झाली. त्यांना सहकाऱ्यांनी उपचाराकरीता लक्ष हॉस्पीटल वाडी येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे. पळून गेलेल्या आयशर ट्रक चालकाचा लोकांनी पाठलाग करून काही अंतरावर थांबविले. पोलीसांनी त्यास ताब्यात घेतले.

याप्रकरणी फिर्यादी पोहवा. नारायण चौधरी वाहतुक शाखा, एम.आय.डी.सी., नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. उत्तम जायभाये यांनी आरोपी ट्रक चालक नामे लक्ष्मण चिंधूजी पऱ्हाडकर, वय ४७ वर्षे, रा. टाकळी, वार्ड नं. ०२, ता. सेलू, जि. वर्धा याचेविरूध्द कलम २८१, १२५(अ),

१२५(ब), ३२४(४) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस ताब्यात घेतलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एम.आय.डी.सी.:— गोडावूनमधून चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी किशोर सिताराम मसराम, वय ५२ वर्षे, रा. व्हि.आय.पी. रोड, धरमपेठ, गवळीपूरा, नागपूर हे ओम इंटरप्रायजेस, मयुर टाईल्स, धंतोली येथे मॅनेजर पदावर असून, पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत, प्लॉट क्र. ४५/ए येथे मयुर टाईल्सचे गोडावुन आहे. गोडावूनचे नुतनिकरणाचे काम सुरू असून, तेथे लागणारे के.ई.आय. कंपनीचे विविध रंगाचे व वेगवेगळ्या एम.एम. चे ईलेक्ट्रीक वायर बंडले किंमती ५,००,०००/—रू. चा मुद्देमाल फिर्यादी यांनी ठेवला होता. दिनांक ०६.०५.२०२६ चे १५.०० वा. ते दि. ०७.०५.२०२६ चे १०.३० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीने ठेवलेल्या गोडावूनमधून ईलेक्ट्रीक वायर बंडले एकुण किंमती ५,००,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे मसपोनि. किशोरी माने ९५९४९६५३९० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे यशोधरानगर :—** राकेशसिंह मलकानसिंह ठाकुर, वय ५५ वर्षे, रा. शाहु मोहल्ला, कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपूर हे दिनांक ०३.०५.२०२६ रोजी पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ८ इंच, केस— काळे, अंगात— निळ्या रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



राकेशसिंह

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०३४२६ /२००८ | कलम ३२६, ३४ भा.दं.वि. | १) अनिल रामअभिलाष तिवारी, २) राजेश रामअभिलाष तिवारी, दोन्ही रा. शिवसेना ऑफिस, पांढराबोडा, संजयनगर, अंबाझरी नागपूर. | १६.०५.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **२.** | मा. ४ थे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, खोली क्र.१०४, नागपुर. | ३०१८९३ /२००७ | कलम ४२०,५०६ भा.दं.वि. | १) राजु उर्फ गोगा सोहनलाल शर्मा, वय ३२ वर्षे, रा. मानकापूर पोस्ट ऑफिसच्या मागे, शर्मा चाळ, मानकापूर. २) अलीहसन खान सम्मी उल्लाखान, वय २२ वर्षे, रा. मानकापूर पोस्ट ऑफिसच्या मागे, किराड ले—आऊट, नागपूर. ३) अश्वीन विलीयम चौव्हाण, वय २२ वर्षे, रा. मानकापूर, मौर्य कॉम्प्लेक्स, तिसरा माळा, पाटील हार्डवेअर मागे, नागपूर. ४) आकाश राजेंद्र चौधरी, वय २२ वर्षे, रा. रामनगर, पांढराबोडी, बुध्द विहार जवळ, अंबाझरी, नागपूर. | १८.०५.२०२६ |

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**